# JNPA Celebrated 37 Years of Serving the Nation Through Maritime Excellence in the presence of Shri Sarbanada Sonowal, the Hon'ble Union Minister of Ports, Shipping and Waterways

*Signing of MoUs along with the felicitation of Stakeholders and Employees*

**Mumbai, May 29th, 2026:** Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) - India's Largest Container Port, celebrated its 37th Foundation Day with great enthusiasm and grandeur in the esteemed presence of Hon'ble Shri Sarbananda Sonowal, Union Minister of Ports, Shipping and Waterways along with other dignitaries.

During the event, JNPA's corporate film showcasing the port's journey, achievements, infrastructure capabilities, sustainability initiatives, and future vision was screened before the distinguished gathering. The celebration was followed by an Award Ceremony, where JNPA stakeholders were felicitated by the Hon'ble Union Minister for their exceptional contribution as JNPA achieved its highest-ever container throughput of 8.17 million TEUs in the financial year 2025-26, registering a robust 11.94% growth. JNPA also marked the highest ever overall throughput of 102 MMT signifying their dedicated service towards the port's growth and operational excellence.

The Hon'ble minister also inaugurated JNPA's newest innovation—NIVIDA. Developed by JNPA in collaboration with AI Transmute Solutions, NIVIDA is India's first AI-driven tender evaluation engine. The Indigenous Vessel Traffic Services (iVTS) system was also inaugurated, marking a significant step towards strengthening indigenous maritime technology capabilities through its installation, management, and training initiatives.

Speaking at the occasion **Hon'ble Union Minister of Ports, Shipping and Waterways, Shri Sarbananda Sonowal,** said, *"On this proud occasion of the 37th Foundation Day, I extend my heartfelt congratulations to the entire JNPA family — its leadership, officers, employees, workers, and stakeholders — for their dedication*

*and contribution to the nation's growth story. What is truly commendable about JNPA is its continuous pursuit of transformation and improvement. The MoUs being exchanged today and the inauguration of new technologies and initiatives are a reflection of this progressive mindset. In a sector where precision, speed, and adaptability are critical, even focus on incremental advancements have the potential to create significant impact across the entire maritime and logistics ecosystem."*

**He added,** *"Under the visionary leadership of Hon'ble Prime Minister Narendra Modi, India's maritime sector is witnessing unprecedented growth and modernisation through landmark initiatives that remain essential in achieving India's vision of becoming a global maritime powerhouse. I am confident that JNPA will continue to set new benchmarks in operational efficiency, sustainability, innovation, and customer-centric services in the years ahead."*

The Foundation Day celebration also witnessed the signing and exchange of several Memorandums of Understanding (MoUs), reinforcing JNPA's commitment towards infrastructure development, innovation, sustainability, and stakeholder collaboration. One MoU was signed between JNPA and CSIR- National Environmental Engineering Research Institute (NEERI) for environmental planning, assessment, pollution control, climate resilience and ESG initiatives. This MoU establishes a framework for institutional engagement between the JNPA and CSIR-NEERI to support sustainable and environmentally compliant port development.

Another MoU is signed between JNPA and Commissioner of Customs (General), Jawaharlal Nehru Custom House (JNCH) for safe, scientific, environmentally compliant and time-bound destruction of perishable cargo through in-situ biodegradation/composting/biogas processes. This MoU establishes a framework for cooperation between the JNPA and JNCH for efficient disposal of such cargo in compliance with statutory and environmental norms.

An MoU was signed between JNPA and Convergence Energy Services Limited (CESL) for the development of EV Charging Stations and Battery Swapping Stations (BSS) within JNPA premises, including promotion of electric mobility, sustainable logistics, and green infrastructure.

Other important collaboration took place between JNPA and REC Power Development and Consultancy Limited through MoU for Providing Project Management Consultancy (PMC) services for extension of Shore Power Supply system at NSFT, NSICT, BMCT and NSIGT terminals at JNPA. Energy Efficiency Services Limited (EESL) also signed an MoU with JNPA for Implementation of energy efficiency, solar power projects, BESS, lighting systems, and related infrastructure across JNPA buildings, ports, and colonies through PMC mode.

Indian Institute of Technology Madras (IITM) has associated with JNPA thorugh MoU for the development of collaborative solutions for the port and maritime sector, including modelling, simulation, dredging, navigation, monitoring systems, digital twins, Just –In-Time (JIT), iVTS and related indigenous technologies for JNPA and allied maritime facilities.

**Shri Gaurav Dayal, IAS, Chairperson, JNPA,** expressed his thoughts saying, *"On the occasion of JNPA's 37th Foundation Day, I extend my sincere gratitude to all our stakeholders, trade partners, terminal operators, board members, employees, and the entire port fraternity whose continued trust and collaboration have been integral to JNPA's growth journey. As global trade corridors evolve and new economic opportunities emerge, the responsibility on JNPA becomes even greater. I am certain that with its institutional strength, progressive outlook, and collective commitment of all stakeholders, JNPA will continue to shape not just maritime growth but the broader trajectory of India's development journey in the decades ahead."*

Several stakeholders from the maritime, logistics, trade, and port community also conveyed their wishes and appreciation on the occasion, acknowledging JNPA's contribution towards strengthening India's maritime sector and economic growth.

The event concluded with the felicitation of the JNPA employess and a vote of thanks presented by Shri Ravish Kumar Singh, IRTS, Dy. Chairperson, JNPA, expressing gratitude to the dignitaries, board member, stakeholders, employees, and all associated partners for their continued support and participation in JNPA's remarkable journey. In line with the guidance of the government of India during the

prevailing Middle East situation, JNPA ensured that the event and associated activities were conducted with utmost responsibility, adhering strictly to all prescribed rules, protocols, and regulatory guidelines.

***

## SPECIAL RECOGNITIONS FOR THE YEAR – 2025-26

1. Container terminal for handling highest container volume at jn port in a year during 2025-26: m/s. Bharat mumbai container terminals pvt. Ltd. (Bmct) - 2.69 million teus.
2. Container terminal for best vessel berth productivity at jn port in a year during 2025-26: m/s. Apm terminals-mumbai (apmt) - highest berth productivity of 114.86 moves/hour.
3. Container terminal for best vessel crane productivity at in port in a year during 2025-26: m/s. Dp world (nsigt) - highest crane productivity of 30.15 moves /hour.
4. Container terminal for highest growth in container handling volumes at jn port during 2025-26: m/s. Nhava sheva freeport terminal (nsft) - highest container voume growth of 40.87%.
5. Terminal for contribution to modal shift at jn port in a year during 2025-26 :- m/s. Nhava sheva distribution terminal (nsdt) coils/slabs/rails/pipes) -1.13 million tonnes break bulk cargo (steel
6. Centralized parking plaza for best direct port entry initiative at jn port in a year during 2025-26 m/s. Divvya cpp pvt. Ltd. Universal e-seal reader implementation with ocr/anpr camera for full gate automation.
7. Shipping company for highest container volume handled at jn port in a year during 2025-26:- m/s. Msc agency india pvt ltd. 1.01 million teus.
8. Company for highest steel coil volumes handled at jn port in a year during 2025-26:- m/s. Arcelor mittal nippon steel ltd 0.9 million mt.
9. Container freight station (cfs) for highest import containers handled at jn port in a year during 2025-26: m/s. Allcargo terminals ltd. - 2,20,229 teus.
10. Consignee for highest dry bulk cargo handled at jn port in a year during 2025-26: m/s. Ultratech cement ltd. - 1.96 million tonnes.
11. Consignee for highest liquid cargo handled at jn port in a year during 2025-26: m/s. Indian oil corporation ltd. (Iocl)- 0.99 million tonnes.
12. Tankfarm operator for highest liquid cargo handled at jn port in a year during 2025-26: m/s. Ganesh benzoplast ltd.- 1.23 million tonnes.
13. Highest number of liquid vessels handled by a terminal operator in 2025-26-m/s. Bpcl-390 vessels.

14. Importer for highest import containerised cargo including direct port delivery (dpd) handled at jn port during 2025-26: m/s hp india sales private limited. Value of rs. 10,338.71 crore
15. Exporter for highest export containerised cargo including direct port entry (dpe) handled at jn port during 2024-25: m/s bajaj auto limited - value of rs. 17,821 crores
16. Jnpsez unit for fastest setting up and operationalisation of sez unit 2025--26: m/s. Tbi maze processors pvt. Ltd
17. Jnpsez unit for introducing innovative technology in construction 2025--26: m/s. Welspun one logistics park.
18. All time high in terms of number of trains placed and container volumes moved by container train operator in 2025-25m/s. Concor-4065 trains & 7,42,546 teus.
19. Youngest upcoming ppp terminal at jnpa-m/s. Jsw-jjltpl liquid terminal

**About Jawaharlal Nehru Port Authority (JNPA):**
The Jawaharlal Nehru Port Authority (JNPA) is one of the premier container-handling ports in India. Since its inception on May 26, 1989, JNPA has transformed from a bulk cargo terminal into the premier container port in the country.
Currently, JNPA operates five container terminals - NSFT, NSICT, NSIGT, BMCT and APMT. The Port also has a shallow water berth for general cargo operated by Nhava Sheva Distribution Terminal Pvt. Ltd. (NSDT). A Liquid Cargo Terminal present at the JNPA Port is managed by the BPCL-IOCL consortium and the additional liquid cargo terminal developed by JNPA is operated by M/s JSW - JNPT Liquid Terminal Pvt. Ltd. Additionally, the newly constructed coastal berth links other Indian ports and facilitates enhancing the traffic of coastal cargo.
Nestled across 277 hectares of land, JNPA also operates a meticulously designed multi-product SEZ, with state-of-the-art infrastructure, to boost export-oriented industries in India. JNPA is also developing an all-weather, deep-draft, greenfield port at Vadhvan, the 13th Major Port of India in Maharashtra. It is poised to be among the top 10 ports globally and will be a 100% green port since its inception.

**For media enquiries, please contact:**
Ambika Singh
Sr. Manager (Marketing), JNPA
Mob: +91 9920372677
E-mail: ambikasingh@jnport.gov.in
**Visit our website and social media to learn more:**
JN Port: www.jnport.gov.in
LinkedIn: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority
X: @JNPort

INDIA'S LARGEST CONTAINER PORT

Instagram: @jnpaport
Facebook: @JNPA
— Ends —

**केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री मा. श्री सर्बानंद सोनोवाल यांच्या उपस्थितीत जेएनपीएच्या 'सागरी उत्कृष्टतेद्वारे राष्ट्रसेवेचा' ३७ वर्षांचा गौरवशाली प्रवास साजरा करण्यात आला**

*हितधारक आणि कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्याबरोबरच सामंजस्य करार करण्यात आले*

**मुंबई, 29 मे 2026:** भारतातील सर्वात मोठे कंटेनर बंदर असलेल्या जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाने (जेएनपीए) आपला 37 वा स्थापना दिन केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री मा. श्री सर्बानंद सोनोवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि दिमाखात साजरा केला.

या कार्यक्रमादरम्यान जेएनपीएच्या प्रवासाची, उल्लेखनीय कामगिरीची, अत्याधुनिक पायाभूत सुविधांची, हरित उपक्रमांची तसेच भविष्यातील विकास आराखड्याची माहिती देणारा कॉर्पोरेट चित्रफीत मान्यवरांसमोर प्रदर्शित करण्यात आला. त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले, ज्यामध्ये मा. केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएच्या भागधारकांचा विशेष गौरव करण्यात आला. आर्थिक वर्ष 2025-26 मध्ये जेएनपीएने आतापर्यंतची सर्वाधिक 8.17 दशलक्ष टीईयू कंटेनर हाताळणी नोंदवत 11.94 टक्क्यांची भक्कम वाढ साध्य केली. तसेच, एकूण कार्गो हाताळणीतही 102 दशलक्ष मेट्रिक टन ही विक्रमी कामगिरी नोंदविण्यात आली. बंदराच्या विकासात आणि कार्यप्रणालीतील उत्कृष्टता साध्य करण्यात दिलेल्या उल्लेखनीय योगदान आणि समर्पित सेवेसाठी विविध भागधारकांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

यावेळी मा. केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएच्या नव्या अभिनव उपक्रमाचे —'निविदा' (NIVIDA) चे उद्घाटन करण्यात आले. जेएनपीए आणि एआय ट्रान्सम्यूट सोल्यूशन्स यांच्या संयुक्त विद्यमाने विकसित करण्यात आलेले 'निविदा' हे भारतातील पहिले कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित निविदा मूल्यांकन प्रणाली आहे. तसेच, स्वदेशी व्हेसल ट्रॅफिक सर्व्हिसेस (आयव्हीटीएस) प्रणालीचेही उद्घाटन करण्यात आले. या प्रणालीच्या स्थापनेद्वारे, व्यवस्थापनाद्वारे आणि प्रशिक्षण उपक्रमांद्वारे स्वदेशी सागरी तंत्रज्ञान क्षमतांना अधिक बळकटी देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे.

त्यानंतर पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करण्यात आला, ज्यामध्ये माननीय केंद्रीय मंत्र्यांच्या हस्ते जेएनपीएचे भागधारक आणि कर्मचारी यांचा बंदराच्या विकासात तसेच कार्यप्रणालीतील उत्कृष्टता साध्य करण्यासाठी दिलेल्या उल्लेखनीय योगदान आणि समर्पित सेवेसाठी गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना **केंद्रीय बंदरे, जलवाहतूक आणि जलमार्ग मंत्री मा. श्री सर्बानंद सोनोवाल** म्हणाले, *''जेएनपीएच्या ३७ व्या स्थापना दिनानिमित्त मी जेएनपीए परिवारातील अध्यक्ष, उप-अध्यक्ष, अधिकारी, कर्मचारी, कामगार आणि सर्व भागधारकांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. राष्ट्राच्या प्रगतीमध्ये त्यांच्या समर्पित योगदानाची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. जेएनपीएची सातत्याने*

*परिवर्तन आणि प्रगती साधण्याची धडपड विशेष उल्लेखनीय आहे. आज करण्यात आलेले सामंजस्य करार (एमओयू) तसेच नव्या तंत्रज्ञान आणि उपक्रमांचे उद्घाटन ही त्याच प्रगतिशील विचारसरणीची साक्ष आहे. अचूकता, वेग आणि बदलांशी जुळवून घेण्याची क्षमता अत्यंत महत्त्वाची असलेल्या या क्षेत्रात, लहान पण लक्ष केंद्रीत सुधारणा देखील संपूर्ण सागरी आणि लॉजिस्टिक्स परिसंस्थेवर मोठा सकारात्मक परिणाम घडवू शकतात.''*

ते पुढे म्हणाले, *''मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली भारताचा सागरी क्षेत्र अभूतपूर्व प्रगती आणि आधुनिकीकरणाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे. देशाला जागतिक सागरी महासत्ता बनविण्याच्या दृष्टीने राबविण्यात येणारे महत्त्वपूर्ण उपक्रम या परिवर्तनात अत्यंत निर्णायक ठरत आहेत. आगामी काळात जेएनपीए कार्यक्षमता, शाश्वतता, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि ग्राहककेंद्री सेवांमध्ये नवे मानदंड प्रस्थापित करत राहील, असा मला पूर्ण विश्वास आहे.''*

वर्धापन दिन सोहळ्यात विविध सामंजस्य करारांवर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. पायाभूत सुविधांचा विकास, नाविन्यपूर्ण उपक्रम, शाश्वतता आणि भागधारकांमधील सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या जेएनपीएच्या वचनबद्धतेचा हा महत्त्वपूर्ण भाग होता. यापैकी एक सामंजस्य करार जेएनपीए आणि सीएसआयआर - नॅशनल एन्व्हायर्नमेंटल इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिट्यूट (नीरी) यांच्यात पर्यावरणीय नियोजन, मूल्यांकन, प्रदूषण नियंत्रण, हवामान अनुकूलता आणि ईएसजी उपक्रमांसाठी करण्यात आला. या करारामुळे शाश्वत आणि पर्यावरणीय नियमांचे पालन करणाऱ्या बंदर विकासाला चालना देण्यासाठी जेएनपीए आणि सीएसआयआर-नीरी यांच्यात संस्थात्मक सहकार्याची प्रभावी यंत्रणा निर्माण होणार आहे.

तसेच, जेएनपीए आणि जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊस (जेएनसीएच) चे सीमाशुल्क आयुक्त (सामान्य) यांच्यात नाशवंत मालाची सुरक्षित, वैज्ञानिक, पर्यावरणीय नियमांचे पालन करणारी आणि निश्चित कालमर्यादेत विल्हेवाट लावण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या प्रक्रियेत जैवविघटन, कंपोस्टिंग आणि बायोगॅस निर्मितीसारख्या ऑन-साइट तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येणार आहे. वैधानिक आणि पर्यावरणीय निकषांचे पालन करत अशा मालाची कार्यक्षम विल्हेवाट सुनिश्चित करण्यासाठी जेएनपीए आणि जेएनसीएच यांच्यात सहकार्याची प्रभावी यंत्रणा या कराराद्वारे निर्माण करण्यात आली आहे.

जेएनपीए आणि कॉन्व्हर्जन्स एनर्जी सर्व्हिसेस लिमिटेड (सीईएसएल) यांच्यात जेएनपीए परिसरात इलेक्ट्रिक वाहनांसाठी (ईव्ही) चार्जिंग स्टेशन आणि बॅटरी स्वॅपिंग स्टेशन (बीएसएस) उभारण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या कराराअंतर्गत इलेक्ट्रिक मोबिलिटीला प्रोत्साहन, शाश्वत लॉजिस्टिक्स व्यवस्था आणि हरित पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष भर देण्यात येणार आहे.

जेएनपीए आणि आरईसी पॉवर डेव्हलपमेंट अँड कन्सल्टन्सी लिमिटेड यांच्यात एनएसएफटी, एनएसआयसीटी, बीएमसीटी आणि एनएसआयजीटी टर्मिनल्स येथे शोर पॉवर सप्लाय प्रणालीच्या विस्तारासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (पीएमसी) सेवा पुरविण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. तसेच, एनर्जी एफिशियन्सी सर्व्हिसेस लिमिटेड (ईईएसएल ) आणि जेएनपीए यांच्यातही ऊर्जा कार्यक्षमता, सौर ऊर्जा प्रकल्प, बॅटरी ऊर्जा संचय प्रणाली (बीईएसएस), प्रकाश व्यवस्था आणि संबंधित पायाभूत

सुविधांची अंमलबजावणी करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. हा प्रकल्प जेएनपीएच्या इमारती, बंदर परिसर आणि वसाहतींमध्ये पीएमसी पद्धतीद्वारे राबविण्यात येणार आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी मद्रास (आयआयटी मद्रास) आणि जेएनपीए यांच्यात बंदर आणि सागरी क्षेत्रासाठी संयुक्त तांत्रिक उपाययोजना विकसित करण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. या सहकार्याअंतर्गत मॉडेलिंग, सिम्युलेशन, ड्रेजिंग, नेव्हिगेशन, मॉनिटरिंग सिस्टिम्स, डिजिटल ट्विन्स, जस्ट-इन-टाइम (जेआयटी), आयव्हीटीएस तसेच जेएनपीए आणि संबंधित सागरी सुविधांसाठी स्वदेशी तंत्रज्ञान विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे.

यावेळी जेएनपीएचे अध्यक्ष **श्री गौरव दयाल, भा.प्र.से.** म्हणाले, *"जेएनपीएच्या ३७ व्या वर्धापन दिनानिमित्त मी आमचे सर्व भागधारक, व्यापार भागीदार, टर्मिनल ऑपरेटर्स, संचालक मंडळाचे सदस्य, कर्मचारी आणि संपूर्ण बंदर समुदायाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. त्यांच्या सातत्यपूर्ण विश्वास, सहकार्य आणि सहभागामुळेच जेएनपीएचा विकास प्रवास अधिक सक्षम आणि यशस्वी झाला आहे. जागतिक व्यापार केंद्रामध्ये होत असलेले बदल आणि नव्या आर्थिक संधींच्या पार्श्वभूमीवर जेएनपीएची जबाबदारी अधिक महत्त्वपूर्ण होत आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, संस्थात्मक क्षमता, प्रगतिशील दृष्टीकोन आणि सर्व भागधारकांच्या सामूहिक बांधिलकीच्या बळावर जेएनपीए आगामी काळात केवळ सागरी क्षेत्राच्या विकासालाच नव्हे, तर भारताच्या व्यापक विकास प्रवासालाही नवी दिशा देत राहील."*

सागरी, लॉजिस्टिक्स, व्यापार आणि बंदर क्षेत्रातील अनेक भागधारकांनीही या प्रसंगी आपल्या शुभेच्छा आणि कौतुक व्यक्त केले. भारताच्या सागरी क्षेत्राला बळकटी देण्यासाठी तसेच देशाच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी जेएनपीएने दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानाची त्यांनी प्रशंसा केली.

जेएनपीए कर्मचाऱ्यांचा सत्कार करून कार्यक्रमाची सांगता जेएनपीएचे उपाध्यक्ष श्री रविश कुमार सिंग, भा. रे. वा. से. यांच्या आभार प्रदर्शनाने झाली. त्यांनी मान्यवर, संचालक मंडळाचे सदस्य, भागधारक, कर्मचारी तसेच सर्व संबंधित भागीदारांचे जेएनपीएच्या उल्लेखनीय प्रवासात दिलेल्या सातत्यपूर्ण सहकार्य आणि सहभागाबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले. सद्यस्थितीतील मध्य पूर्वेतील परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारच्या मार्गदर्शनानुसार, जेएनपीएने हा कार्यक्रम आणि त्यासंबंधित सर्व उपक्रम अत्यंत जबाबदारीने, तसेच सर्व निर्धारित नियम, प्रोटोकॉल आणि नियामक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करून पार पाडले.

***

## वर्ष – २०२५-२६ चे विशेष सन्मान

- जवाहरलाल नेहरू बंदर येथे वर्ष 2025-26 दरम्यान सर्वाधिक कंटेनर हाताळणी करणारे टर्मिनल म्हणून एम/एस भारत मुंबई कंटेनर टर्मिनल्स प्रा. लि. (बीएमसीटी) यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 2.69 दशलक्ष टीईयू इतकी उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.
- वर्ष 2025-26 मध्ये सर्वोत्तम जहाज बर्थ उत्पादकतेसाठी एम/एस एपीएम टर्मिनल्स मुंबई (एपीएमटी) यांना सन्मानित करण्यात आले असून त्यांनी 114.86 मूव्हज प्रति तास इतकी सर्वोच्च बर्थ उत्पादकता साध्य केली आहे.
- जहाज क्रेन उत्पादकतेतील उत्कृष्ट कामगिरीसाठी एम/एस डीपी वर्ल्ड (एनएसआयजीटी) यांना गौरविण्यात आले असून त्यांनी 30.15 मूव्हज प्रति तास इतकी सर्वोच्च क्रेन उत्पादकता नोंदविली आहे.
- वर्ष 2025-26 मध्ये जेएनपीए येथे कंटेनर हाताळणीमध्ये सर्वाधिक वाढ नोंदविणाऱ्या टर्मिनल म्हणून एम/एस न्हावा शेवा फ्रीपोर्ट टर्मिनल (एनएसएफटी) यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 40.87% इतकी सर्वोच्च वाढ साध्य केली आहे.
- त्याचप्रमाणे, मॉडेल शिफ्टसाठी दिलेल्या महत्त्वपूर्ण योगदानासाठी एम/एस न्हावा शेवा डिस्ट्रीब्युशन टर्मिनल (एनएसडीटी) यांना सन्मानित करण्यात आले असून, त्यांनी स्टील (कॉइल्स/स्लॅब्स/रेल्स/पाईप्स) स्वरूपातील 1.13 दशलक्ष टन ब्रेक-बल्क कार्गो हाताळून उल्लेखनीय कामगिरी केली आहे.
- तसेच, जेएनपीएतील सर्वोत्तम डायरेक्ट पोर्ट एन्ट्री उपक्रमासाठी सेंट्रलाइज्ड पार्किंग प्लाझा श्रेणीत एम/एस दिव्या सीपीपी प्रा. लि. यांना गौरविण्यात आले. त्यांच्या युनिव्हर्सल ई-सील रीडर प्रणालीच्या अंमलबजावणीमुळे ओसीआर/एएनपीआर कॅमेऱ्यांच्या सहाय्याने पूर्ण गेट ऑटोमेशन साध्य करण्यात आले आहे.
- वर्ष 2025-26 दरम्यान जेएनपीए येथे सर्वाधिक कंटेनर हाताळणी करणारी शिपिंग कंपनी म्हणून एम/एस एमएससी एजन्सी इंडिया प्रा. लि. यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 1.01 दशलक्ष टीईयू इतकी कामगिरी नोंदविली आहे.
- त्याचप्रमाणे, जेएनपीए येथे सर्वाधिक स्टील कॉइल्स हाताळणी करणारी कंपनी म्हणून एम/एस आर्सेलर मित्तल निप्पॉन स्टील लि. यांना सन्मानित करण्यात आले असून, त्यांनी 0.9 दशलक्ष मेट्रिक टन इतकी कामगिरी साध्य केली आहे.
- तसेच, कंटेनर फ्रेट स्टेशन (सीएफएस) श्रेणीत सर्वाधिक इम्पोर्ट कंटेनर हाताळणीसाठी एम/एस ऑलकार्गो टर्मिनल्स लि. यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 2,20.229 टीईयू इतकी उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.
- वर्ष 2025-26 दरम्यान जेएनपीए येथे सर्वाधिक ड्राय बल्क कार्गो हाताळणी करणारे कन्सायनी म्हणून एम/एस अल्ट्राटेक सिमेंट लि. यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 1.96 दशलक्ष मेट्रिक टन इतकी उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.
- त्याचप्रमाणे, सर्वाधिक लिक्विड कार्गो हाताळणी करणारे कन्सायनी म्हणून एम/एस इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लि. यांना सन्मानित करण्यात आले असून, त्यांनी 0.99 दशलक्ष मेट्रिक टन इतकी कामगिरी साध्य केली आहे.
- तसेच, टँकफार्म ऑपरेटर श्रेणीत सर्वाधिक लिक्विड कार्गो हाताळणीसाठी एम/एस गणेश बेन्झोप्लास्ट लि. यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 1.23 दशलक्ष मेट्रिक टन इतकी उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे.

- वर्ष 2025-26 दरम्यान जेएनपीए येथे सर्वाधिक लिक्विड जहाजे हाताळणारे टर्मिनल ऑपरेटर म्हणून एम/एस बीपीसीएल यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी 390 जहाजे हाताळली आहेत.
- तसेच, जेएनपीए येथे सर्वाधिक इम्पोर्ट कंटेनराइज्ड कार्गो (डायरेक्ट पोर्ट डिलिव्हरी – डीपीडी सहित) हाताळणारे आयातदार म्हणून एम/एस एचपी इंडिया सेल्स प्रायव्हेट लिमिटेड यांना सन्मानित करण्यात आले असून, त्यांनी रु.10,338.71 कोटी इतक्या मूल्याचा कार्गो हाताळला आहे.
- याचप्रमाणे, जेएनपीए येथे सर्वाधिक एक्सपोर्ट कंटेनराइज्ड कार्गो (डायरेक्ट पोर्ट एंट्री – डीपीई सहित) हाताळणारे निर्यातदार म्हणून एम/एस बजाज ऑटो लिमिटेड यांना गौरविण्यात आले असून, त्यांनी रु. 17,821 कोटी इतक्या मूल्याचा कार्गो निर्यात केला आहे.
- जेएनपीए विआक्षे युनिट श्रेणीत 2025-26 दरम्यान सर्वात जलद विआक्षे युनिट उभारणी आणि कार्यान्वयनासाठी एम/एस टीबीआय मॅझ प्रोसेसर्स प्रा. लि. यांना गौरविण्यात आले आहे.
- तसेच, बांधकाम क्षेत्रात नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची ओळख करून देण्यासाठी एम/एस वेल्स्पन वन लॉजिस्टिक्स पार्क यांना सन्मानित करण्यात आले आहे.
- याचप्रमाणे, कंटेनर ट्रेन ऑपरेटर श्रेणीत 2025-26 मध्ये सर्वकालीन सर्वोच्च कामगिरी नोंदविणाऱ्या एम/एस कॉनकॉर यांना 4065 ट्रेन चालविणे आणि 7,42,546 टीईयू इतका कंटेनर व्हॉल्यूम हाताळल्याबद्दल गौरविण्यात आले आहे.
- तसेच, जेएनपीएतील सर्वात नव्याने विकसित होत असलेल्या पीपीपी टर्मिनल म्हणून एम/एस जेएसडब्ल्यू–जेजेएलटीपीएल लिक्विड टर्मिनल यांचा सन्मान करण्यात आला आहे.

**जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जेएनपीए) विषयी माहिती:**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण (जनेप प्राधिकरण) हे भारतातील प्रमुख कंटेनर हाताळणी बंदरांपैकी एक आहे. 26 मे 1989 रोजी स्थापना झाल्यापासून, जनेप प्राधिकरण एक बल्क कार्गो टर्मिनलवरून देशातील प्रमुख कंटेनर बंदरात रूपांतरित झाले आहे.

सध्या, जनेप प्राधिकरण पाच कंटेनर टर्मिनल्स चालवते एन एस एफ टी, एन एस आय सी टी, एन एस आय जी टी, बी एम सी टी आणि ए पी एम टी. न्हावा शेवा डिस्ट्रिब्युशन टर्मिनल प्रा. लि. (एनएसडीटी) द्वारे संचालित सामान्य मालासाठी एक उथळ पाण्याचा बर्थ देखील आहे. जनेप प्राधिकरण पोर्टवर उपस्थित असलेले लिक्विड कार्गो टर्मिनल बीपीसीएल आयओसीएल कन्सोर्टियम द्वारे व्यवस्थापित केले जाते आणि जेएनपीएने विकसित केलेले अतिरिक्त लिक्विड कार्गो टर्मिनल मेसर्स जेएसडब्ल्यू - जेएनपीटी लिक्विड टर्मिनल प्रा. लि. द्वारे चालवले जाते. या व्यतिरिक्त, नव्याने बांधलेला किनारी धक्का इतर भारतीय बंदरांना जोडतो आणि किनारपट्टीवरील कंटेनरची वाहतूक वाढवते.

277 हेक्टर जमिनीवर वसलेले, जनेप प्राधिकरण भारतातील निर्यात-केंद्रित उद्योगांना चालना देण्यासाठी, अत्याधुनिक पायाभूत सुविधांसह, काळजी पूर्वक डिझाइन केलेले बहुउत्पादक विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) देखील चालवते.

जेएनपीए वाढवण येथे एक सर्व-हवामान, डीप ड्राफ्ट, ग्रीनफिल्ड बंदर विकसित करत आहे, जे महाराष्ट्रातील भारताचे १३वे मोठे बंदर असेल. हे जागतिक स्तरावरील सर्वोत्कृष्ठ १० बंदरांमध्ये स्थान मिळवणार आहे आणि स्थापनेपासून १००% हरित बंदर असेल.

**मीडिया चौकशीसाठी, कृपया संपर्क साधा:**


**जनेप प्राधिकरण:**

अंबिका सिंग

सीनियर मॅनेजर (मार्केटिंग), जनेप प्राधिकरण

मोबाईल क्रमांक: +919920372677

ईमेल: ambikasingh@jnport.gov.in


**अधिक माहितीसाठी आमच्या वेबसाइट आणि सोशल मीडियाला भेट द्या:**

जेएन पोर्ट : www.jnport.gov.in

लिंक्डइन: JNPA- Jawaharlal Nehru Port Authority

एक्स: @JNPort

इंस्टाग्राम: @jnpaport

फेसबुक: @JNPA